# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

Edition 2

**जुलै २०१४**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.

**जुलै २०१४**

## या अंकात


- अध्यक्षीय
- प्रस्तावना
- राजा - आगळे शब्दांकन (लेख)
- गप्पा आणि ओळख (एक मुलाखत)
- मराठी शाळा (प्रगतीचा आढावा)
- पहिला सूर्योदय - कविता
- A word from our sponsor
- मराठी शब्दकोडे
- चुटके, गमती जमती
- Community News Roundup
- Our sponsors

# अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

अभिरुचीच्या दुसऱ्या अंकात आपणा सर्वांचे स्वागत असो!

एप्रिल महिन्यात मंडळाचा पाडवा व महाराष्ट्र दिन हा कार्यक्रम थाटात पार पडला. दरवर्षीप्रमाणे ह्या कार्यक्रमात मंडळाने लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेच पण त्याचबरोबर बे एरिआतील व मंडळातील काही कलाकारांनी, सर्व रसिकांना पसंद असणारी मराठी व हिंदी चित्रपट गीते, स्वरधारा ह्या कार्यक्रमात सादर केली. आणि विशेषतः मंडळातील काही हौशी कलाकारांनी फारच कमी अवधीत भारतातील निवडणुक व पुढारयांवर आधारीत एक छोटी हास्य नाटिका सादर केली. सर्वांचे कौतुक करावे तेव्हढे कमीच!

जून महिन्यात मंडळाने पिकनिक आयोजित केली. ह्यावर्षी रिवर राफ्टींग करण्याचा बेत होता. परंतु नदीची कमी पातळी आणि त्यामुळे राफ्टींगला लागणारा वेळ व पिकनिकसाठी पुरेश्या वेळेअभावी हा बेत रद्द करण्यात आला. पुढील वर्षी जमल्यास पुन्हा हा बेत करू.

कळवण्यास आनंद होतो मराठी मंडळ सॅक्रामेंटो, बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि भारती विद्यापीठ, पुणे ह्यांच्या सहकार्याने सुरु झालेल्या मराठी शाळेचे हे पहिले वर्ष आणि त्याचा पहिला यशस्वी टप्पा आम्ही पार पाडला आहे. भारती विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या ५ परीक्षांपैकी पहिल्या वर्गाची परीक्षा या वर्षी घेण्यात आली. पहिले वर्ष आम्ही प्रायोगिक तत्वावर शाळा सुरू करून नंतरच्या वर्षी परीक्षा घेण्याचे ठरविले होते परंतू मुलांचा उत्साह व त्यांची परीक्षेस बसण्याची तयारी पालक व शिक्षक व संयोजक यांनी करून घेतली आणि परीक्षा घेणे शक्य झाले. सर्वांचे खूप आभार आणि पुढील वर्षासाठी शुभेच्छा

ऑगस्ट महिन्यात कॅम्पिंग आणि India Day ह्या दोन्हीही कार्यक्रमाची जय्यत तयारी सध्या सुरु आहे. केवळ एका आठवड्यात कॅम्पिंग साठी ५० हून अधिक जणांनी साइनअप केले!. India Day साठी मराठी मंडळातर्फे दोन कार्यक्रम सादर करीत आहोत. केवळ ४-५ कलाकार नव्हे तर एकूण १४ कलाकारांनी सादर केलेले कोळी नृत्य आणि बाल कलाकारांचा गोविंदा हा नाच, हे दोनही कार्यक्रम लोकप्रिय होतील यात शंकाच नाही.

हां हां म्हणता आमच्या कार्यकारणीला मंडळाचे काम हाती घेऊन पाच महिने झाले. ह्या वर्षांसाठी आखलेल्या उद्दिष्टांसाठी कामे जोमाने चालू आहेत, आणि यापुढेही चालू राहतील. त्यासाठी आमच्या कार्यकारणीला आपले सहकार्य मिळेल ह्याबद्दल शंका नाही. विशेषता देणगीदारांचा पाठींबा! देणगीसंबधीच्या वेगवेगळ्या पॅकेज तयार केल्यानंतर आम्हाला ३ प्लॅटिनम स्पोन्सर्स कडून देणग्या मिळाल्या. देणगीसंबधीच्या पॅकेजबद्दल जेव्हा आम्ही स्थानिक व्यावसायिकांशी बोलतो तेंव्हा आम्ही आतापर्यन्तच्या केलेल्या कार्याची प्रशंसा होते आणि मराठी मंडळाला मदत व्हावी म्हणून देणगी देऊ, जोपर्यंत मराठी मंडळ कार्यरत असेल तोपर्यंत मदत करू, अशा विचारांची माणसे भेटली, म्हणजे आम्हा सर्व कार्यकर्त्यांचा हुरूप वाढतो.

मंडळ पुढे कार्यरत राहण्यास मदत आणि त्यासाठी देणगी किंवा sponsorship मिळवण्याचे काम फक्त कार्यकारिणीचे नसून आपणा सर्वांचे आहे. त्या दृष्टीने आपल्या माहितीची कोणी संस्था किंवा व्यवसाय देणगीदार/sponsors होण्यास इच्छुक असतील तर आम्हाला जरूर कळवावे.

शेवटी सर्वांना एवढेच सांगावेसे वाटते आपली मुले शालेय वयाची असतील तर त्यांना मराठी शाळेत पाठवा. मंडळातील जास्तीतजास्त कार्यक्रमाना हजर राहून आपल्या कलाकारांना उस्फुर्थ प्रतिसाद द्या. विविध कार्यक्रमाचे आयोजन आणि त्यासाठी लागणारी मदत करण्यासाठी पुढे या. आपली मराठी भाषा आणि संस्कृती टिकवण्यासाठी हीच मोठी मदत असे मी मानतो

पुढील कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती आमच्या facebook page व http://mmsac.org website वर वाचत राहा. पुढील कार्यक्रमात आपण लवकरच भेटू.

कळावे लोभ असावा ही विनंती,

विक्रांत सावंत (अध्यक्ष मराठी मंडळ सॅक्रामेंटो)

## अंकाची प्रस्तावना

 **अजित नातू, संपादक**

नमस्कार,

२०१४ चा हा दुसरा अंक प्रदर्शित करताना खूप आनंद होत आहे. हा संपूर्ण अंक आपण वाचावा व अभिप्राय द्यावेत हि विनंती.

या अंकात लेख, कविता ह्याबरोबर शब्दकोडे, चुटके, **comnuity round up** हि नेहेमीची सदरे तर आहेतच**.**

स्मिता कुलकर्णी यांनी 'राजा' ह्या कुत्र्याचे कसे घरात आगमन झाले व तो कसा त्यांचा एक कुटुंबियच बनला याचे सुंदर शब्दांकन वाचून जर तुम्हालापण असा "**man's best friend'** स्वतः घरी आणावा असे वाटेल.

काही वर्षांपूर्वी आपण आपल्याच मंडळातील काही व्यक्तींची ओळख **video** माध्यमातून चीत्रित केली होती हे काही जुन्या सभासदांना आठवत असेल. त्याच धर्तीवर, एक नवीन उपक्रम चालू करतो आहे व तो म्हणजे आपल्याच मंडळातील एका सभासदाची अनौपचारिक ओळख. आपल्या मंडळाचे सेक्रेटरी विक्रम बोबडे यांचाशी मारलेल्या गप्पा व ओळख, अजित नातू यांनी शब्दांकित केली आहे. प्रत्येक अंकात असेच एखाद्या सभासदाची ओळख करून द्यायची असा विचार आहेव हि सुरुवात.

मंडळाने मराठी शाळा सुरु करून आता एक वर्ष झाले हे खरोखरच कौतुकास्पद आहे. मुख्य म्हणजे पुष्कळ मुले त्यात भाग घेत आहेत हे महत्वाचे. शाळेचा वार्षिक आढावा घेतला आहे पल्लवी सावंत यांनी.

उमेदीचा काळ, त्यावेळचे विचार, आकांक्षा, धडाडी याचे वर्णन व स्वतः ची मनस्थिती कवितेच्या माध्यमातून शब्दात पकडले आहेत अजित नातू यांनी कवी मनातून.

रमेश कोतवाल यांनी **insurance** बद्दल मार्गदर्शनपर लेख लिहिला आहे तो नक्कीच मदतीला येईल.

त्याचबरोबर, शब्दकोडे, चुटके, **recipe, community round up** मध्ये काही वाढदिवस, फोटो, पुढील कार्यक्रम वगैरेची माहिती अजित नातू यांनी सांगितली आहे.

**Last but not least,** आपल्या **sponsors** ची ओळख करून दिली आहे.

वेळात वेळ काढून उत्साहाने ज्यांनी ह्या अंकासाठी **contribution** केले व हा अंक प्रदर्शित करण्यास हातभार लावला त्या सर्वांचे मनापासून धन्यवाद आणि खूप खूप आभार. असेच inspiration इतरांनापण मिळेल हे नक्की वाटते.


मंडळाच्या सभासदांनी अंक जरूर वाचून अभिप्राय द्यावा हि पुन्हा विनंती.

धन्यवाद .........



**Contributed by - Smita Kulkarni**

## राजा



"आई, let's get this one, look at him, he is so cute and he likes me, look, he is sitting near me", माझा मुलगा केदार म्हणाला जेव्हा आम्ही नुकत्याच काही आठवड्यापूर्वी जन्मलेल्या black Labrador पप्पीजना बघायला गेलो होतो. खूप दिवसांपासून मुले मागे लागली होती की आपण एक dog आणूया म्हणून पण माझी अजुनी तयारी होत नव्हती. असं वाटायचं की कुत्रा आणला की responsibility वाढणार, फ्रीडम जाणार. त्याला घरात आत आणायला पाहिजे, मग त्याचे केस गळतील, त्याला चालायला न्यायला लागेल, मग India ला जाऊ तेंव्हा त्याला कुठे ठेवायचं? नवरा म्हणायचा, "कशाला एवढी काळजी करतेस? प्रश्न आपोआप सुटतील बघ." तरीही मी मात्र एवढी मोठी commitment करायला धजावत नव्हते. मुलं बिचारी नेटवर research करून नेटाने yellow lab कसा चांगला होईल हे मला पटवत होती. "Labs are very good family dogs आई. They are very smart, kind and calm too. आई आणि you won't be able to see his hair on our beige carpet. We will take him for walks every

day. "You don't have to worry" इति मुले. सहज कामावर कलीग बरोबर बोलताना तिला मी हे सांगितलं. ती म्हणाली, "Do you know our school secretary's daughter's dog just had a litter of puppies? They are black Labradors. They are looking for buyers for the puppies." हे कळल्यावर मात्र मुले जाम मागे लागली. मी मुलांना म्हंटल, "अरे ते puppies black labs आहेत, yellow labs नाही आहेत". तरीही त्यांचे मागे लागणे थांबेना. आई, please let's just go and take a look at least? हे ऐकल्यावर माझे मातेचे हृदय लगेच पाघळले . माझ्या नवऱ्याचा वाढदिवस जवळ आला होता आणि या वाढदिवसाला त्याला एक कुत्र्याचे पील्लुच का नाही भेट द्यावे असे माझ्या मनात विचार येऊ लागले. त्याचे कुत्र्याचे वेड मला माहिती होते. माझ्या या विचारांचे माझे मलाच आश्चर्य वाटले. शेवटी हो नाही करत आम्ही ती पिल्ले बघायला गेलो, असं ठरवत की आत्ता फक्त बघून येऊ, मग ठरवू घ्यायचं की नाही ते, आणि ती काळी पिल्ले होती, बेज नव्हती, जी आमची अट होती. कारण मुलांनी सांगितल होतं की yellow पिल्लू घेतलं तर त्याचे गळलेले केस आपल्या बेज कार्पेटवर दिसणार नाहीत. शेवटी आम्ही एकदाचे निघालो. गाडीतून जाताना मुले सतत न बघितलेल्या पिल्लाबद्दलाच बोलत होती. त्त्यांच्या बोलण्यात नवराही आनंदाने सामील झाला होता. मी मात्र अगदी द्विधा मनस्थितीत होते. तिथे पोचल्यावर dog owner ने आमचे खूप हसत स्वागत केले आणि ती पिल्लांना दाखवायला आम्हाला तिच्या backyard मध्ये घेऊन गेली.जेव्हा आम्ही ती इवली इवली, गोंडस पिल्ले बघितली, तेंव्हा मी तरी head over heels त्यांच्या प्रेमात पडले. त्यांच्या गोंडस पणाला काही सीमाच नव्हती. एकच काय ही सगळीच घरी घेऊन जावीत असं वाटलं. तेव्हड्यात एक अतिशय गोड, बोलक्या डोळ्याचं, मऊ मऊ satin सारख्या कानाचं, खूप क्युटसं पिल्लू केदारच्या जवळ आलं, त्याला चाटू लागलं. जणू काही ते आम्हांला सांगत होतं की

मला घेऊन जा तुमच्याबरोबर. आम्ही सगळ्याच पिल्लांना पेट करत होतो, पण हे एक सारखं सारखं जवळ येत राहिलं. तिथल्या तिथे आमचं decision झालं आणि आम्ही "राजा"ला घरी न्यायचे ठरवले. आमची परतीची कार राईड अतिशय नाविन्यपूर्ण होती. मुलांची चिवचिव, त्या छोट्या पिल्लाची कुईकुई, माझ्या नवऱ्याला झालेला अतिशय आनंद आणि माझे वात्सल्याने भरून आलेले मातेचे हृदय अशा सर्व मिश्र वातावरणात आम्ही घरी परतलो. मुले म्हणाली, "let's take him to the backyard since he is used to being in the grass". त्यामुळे त्याला घेऊन पहिले backyard मधे गेलो. मुले इतकी excited होती. राजा सगळीकडे जाऊन explore करत होता आणि मुले त्याच्या मागे मागे जात होती. त्या दिवसापासून आमचं जीवन राजामय झालं. त्याला दर ३० मिनिटाने बाहेर नेणे, त्याला वेगवेगळ्या कमांड्स शिकवणे, खायला देणे, त्याच्याबरोबर खेळणे, त्याच्या मागे मागे धावणे इत्यादी सर्व गोष्टी मुलांनी आनंदाने त्या विकेंडभर केल्या. त्या नंतरचे बरेच दिवस या नव्या फक्त नऊ आठवड्याच्या cutest member च्या आगमनामुळे adjustment मधे गेले. माझ्या नवऱ्याने राजाला एकदम एकट्याला सोडून जायला नको म्हणून आठवडाभर घरून काम केले. मीही माझी कामाची जागा अगदी घरापासून जवळच असल्यामुळे lunch break मधे घरी येत असे त्याला फिरवण्यासाठी. राजाला ते रुटीन कळू लागल्यावर तोही अगदी आतुरतेने माझी वाट बघत असे. मग आम्ही दोघे घरासमोरच्या छोट्या टेकडीवर फिरून येत असू. तो त्याला शिकवलेल्या कमांड्स भरभर शिकला. मराठी आणि इंग्लिश दोन्ही भाषा मधल्या कमांड्स त्याला चटचट कळू लागल्या. पूर्णपणे बोली भाषा कळत असल्यामुळे तो घरातला एक मेम्बर बनून गेला. त्याला कळू द्यायचे नसेल तेव्हा आम्हाला हिंदीत बोलावे लागते इतकी त्याला स्वच्छ कळते मराठी. त्याच्यामुळे आम्हाला नियमित व्यायामाची सवय लागली. रोज दोन ते तीन मैल चालायची सवय त्यानेच आम्हाला लावली. इतकेच

नाही तर चालणे कसे एन्जॉय करायचे तेही त्याने आम्हाला शिकवले, उन, पाऊस, थंडी, वारा, सगळ्या प्रकारच्या वातावरणाचा मस्त उपबोघ घेणे हा राजाचा हातखंडा आहे. पूलमध्ये मुलांबरोबर पोहणे, त्यांच्या खोलीत जाऊन आनंदाने त्यांच्या बेडमध्ये चढून बसणे, ते video गेम्स खेळत असताना त्यांना शेजारी बसून कंपनी देणे, ते स्न्याक्स खात असतील तर त्याच्यावर हक्क दाखवून आपला भाग खाणे, इत्यादी गोष्टी राजा एकदम हुशारपणे शिकला. एखादी गोष्ट आवडली नाही किंवा मनासारख झाल नाही की स्वारी चप्पल, रिमोट कंट्रोल, सोफ्यावरची उशी, इत्यादी गोष्टी तोंडात धरून धूम पळत सुटायची. हे बघून मुलांनाही त्याच्या मागे पळायला खूप मजा यायची. त्याला मुले शाळेतून यायच्या वेळेला त्यांना आणायला जायला खूप आवडायचे. कधी कधी जमेल तेव्हा मी त्याला घेऊन जायचे. ते दिसले की याची excitement बघण्यासारखी असायची. Hide and seek हा त्याचा अतिशय आवडता खेळ. ज्यांचे नाव घेऊ ती व्यक्ती लपली असेल तर जाऊन शोधायला आणि नंतर शोधल्यावर जोरजोरात पळापळी करायला त्याला खूप आवडते. घरी कोणी आले की हा पहिला पुढे त्यांचे स्वागत करायला. त्यात आणि ओळखीचे लोक असतील तर पटदिशी पळत जाऊन तोंडात एक खेळणे घेऊन येतो, लोकांना प्रेमाने वेलकम करायची त्याची ही युनिक पद्धत. भारतातून जेंव्हा नातेवाईक राहायला येतात तेंव्हा राजा त्यांचे मन जिंकून घेतो. परत जाताना त्यांना आमच्यापेक्षा राजाला सोडून जायचे दुखं असते. माझी बहीण तर म्हणते की राजा हा आपला मागच्या जन्मीचा नक्की कोणीतरी सगासोयरा आहे. माझी आई आलेली असताना ती तिचे मेडीटेशन करायला जाताना त्याला सांगून जायची, मग ती खोलीतून बाहेर येइपर्येन्त हा तिची वाट बघत थांबून राहायचा. फोनवर जेंव्हा जेंव्हा सासूबाईनशी बोलणे व्हायचे तेंव्हा प्रत्येक वेळी न विसरता त्या राजाची चौकशी करायच्या. एकदा माझ्या नणंदा आल्या होत्या. तेंव्हा माझा नवरा सांगायचा राजाला, " जा आत्याकडे जा". तोही भरभर सांगितल्या प्रमाणे त्यांच्याकडे जायचा.

हे सगळे पाहुणे परत जायच्या वेळी जेंव्हा सामान भरायची वेळ येते तेंव्हा मात्र राजाभाऊ खूप उदास होतात. लोक परत जाणार हे त्याला जाणवते. मग तो जमिनीवर तोंड टेकून एकदम शांत होऊन दुसऱ्या खोलीत जाऊन बसतो.

आमच्याकडे आलेल्या कितीतरी लोकांची कुत्र्याची भीती राजाला भेटल्यामुळे कमी झाली. आमची नेहमीची मित्रमंडळी त्याच्या एकदम ओळखीची झाली आहेत. त्यांनाही त्याची छान सवय होऊन गेली आहे. सुरवातीला राजा लहान असताना ते घरी आले की त्यांना त्यांच्या चपला मात्र लपवायला लागायच्या. कारण हा कधी त्या पळवेल हे सांगता यायचे नाही. एकदा माझ्या एका मैत्रिणीची चप्पल गायब झाली. आम्ही सगळीकडे शोधली तेव्हा केदारच्या बेड मध्ये तिचे छोटे छोटे तुकडे सापडले आणि शेजारी राजा महाराज विजयी मुद्रेने आमच्याकडे बघत असलेले आढळले.

तो घरी आल्यापासून आमच्या रोजच्या जीवनात भरपूर excitement आली. त्याचं आमच्यावर भरभरून प्रेम करण पाहिल्यावर मन भरून येत. आमच्यापैकी कोणीही बाहेरून घरी आले की अतिशय प्रेमानी नाचून आपला आनंद दर्शवतो. मग हक्काने बिस्कीट मागतो, जणूकाही त्याला सांगायचे असते की मी गुड बॉय सारखा घरी राहिलो न, आता मला एक बिस्कीट दे बघु.

तो आला तेव्हा मुले elementary school मध्ये होती. आता collage साठी बाहेर आहेत. सुट्टीला घरी आली की अजूनही त्याच्याबरोबर जमिनीवर पडून दंगामस्ती करतात. त्याला कधी कधी त्यांच्या अपार्टमेंटवर राहायला घेऊन जातात. त्यांचे मित्र मैत्रिणी त्याला भेटायला येतात. त्यांच्या मते "dude, your dog is so cool!”

राजा घरी राहायला आल्यापासून त्याने आम्हा सर्वांना खूप काही शिकवले - unconditional love, compassion, living in the moment, being never too old to play and have fun, exercise, enjoying quiet time, being yourself, being loyal, giving space to others and treating everybody just the way you want to be treated.

आपण जसे आपल्या मुलांच्या सॉकर प्रक्टिस, taekwondo क्लास, gymnastics अशा अनंत गोष्टींच्या वेळा पाळतो तसेच आम्ही राजाचे सकाळचे चालणे, त्याच्या खायच्या वेळा, त्याचे समर मधले संध्याकाळचे पोहणे, त्याचे वीकेंडचे Folsom लेकवरचे चालणे, इत्यादीच्या वेळा मनापासून पाळतो. आमच्या मित्र मंडळीनाही माहिती झालेय की कुठल्याही गेट-टुगेदर मधून आम्ही लवकर निघालो की राजा वाट पाहतोय म्हणून चालले हे घरी.

राजा आला तेव्हा नऊ आठवड्याचा होता. आता तो साडे अकरा वर्षाचा आहे. अजूनही तो भरपूर चालतो, पोहतो, आणि भरपूर विश्रांतीही घेतो, त्यात अजिबात हयगय नाही. आता पहिल्या इतका active राहिला नाहीय . Dog-years मध्ये त्याचे वय आता आहे 65 ते 70 वर्षे. मुलांच्या मते "राजा लुक्स सो कुल विथ हिज व्हाईट बिअर्ड, जस्ट लाईक अमिताभ बच्चन". आता त्याला खेळायला एक बहिण पण आलीय; रेवा. त्याच्यासारखीच एक black lab. त्याच्या ११ वर्षाच्या काळात त्याला त्याचे toys कधी शेअर करायला लागले नाहीत पण या नवीन फमिली मेम्बरच स्वागत त्याने फार उत्सहाने जरी केले नाही तरी sibling rivalry न दाखवता केले. सुरुवातीला थोडा सवय व्हायला वेळ लागला पण आता ते एकदम बडीज झालेत.

तर असा हा आमचा हुश्शार राजा! आमच्या घरातला सर्वांचा लाडका - रेवा सकट! मागे वळून बघताना परत परत जाणवत राहते की साडेअकरा वर्षांपूर्वी जेव्हा मन द्‌विधा मनस्थितीत होते तेव्हा माझ्या कम्फर्ट झोन मधून बाहेर येउन एक वेगळे पाऊल टाकायची आलेली संधी मी गमावली नाही हे किती चांगले झाले! त्या दिवशी त्या पिटुकल्या बंडल ऑफ जॉय ला घरी घेऊन आल्यामुळे माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोनच संपूर्णपणे बदलून गेला. त्यासाठी मी माझ्या दोन्ही मुलांची आणि माझ्या नवऱ्याची अत्यंत आभारी आहे.

*"Dogs are our link to paradise. They don't know evil or jealousy or discontent. To sit with a dog on a hillside on a glorious afternoon is to be back in* Eden*, where doing nothing was not boring -- it was* peace.*"* - Milan Kundera





## गप्पा आणि ओळख - विक्रम आणि अस्मिता बोबडे

या आठवड्यात विक्रम आणि अस्मिता बोबडे यांच्याशी गप्पा मारायचा योग आला. गप्पांमध्ये दीड दोन तास कसे निघून गेले कळलेच नाही.

विक्रम मुळचा नागपूरचा. तिथेच त्याचे शाळेचे व कॉलेजचे संपूर्ण शिक्षण झाले. इंजिनीरिंग त्याने नागपूरच्याच REC (आताचे NIT) कॉलेजमधून Electronics घेऊन पूर्ण केले. सर्वसाधारण मध्यमवर्गाच्या घरातील जसे असते तसेच upbringing विक्रमचे झाले; म्हणजेच प्राधान्य कशाला तर मुख्यतः शिक्षणाला, संगीत, पुस्तके, वाचन, नाटक, गाणे, आणि family values. विशेष म्हणजे वाचनाच्या आवडीमुळे एक आगळी वेगळीच घटना त्याच्या शालेय जीवनात घडली किंवा त्याने घडवली.

त्याचा वाचनाच्या प्रचंड आवडीकडे बघून त्याच्या आजोबांनी त्याला खूप वेळा पुस्तके भेट दिली. आणि विक्रम नि काय केले माहिती आहे? त्याने त्या बालवयात चक्क एक स्वतःची library सुरु केली. त्यामधून पुस्तके लोकांना देणे, त्याची रीतसर नोंद करणे, व कमाल म्हणजे लोकांकडून वर्गणी घेणे हे सुरु केले. वा विक्रम! कदाचित ह्यातून भवितव्यातल्या entrepreneurship ची बीजे त्यातून रोवली गेली कि काय? जबरदस्त पुस्तके वाचनामुळे सर्वांगीण व्यक्तिमत्व तर घडलेच आणि कोठल्याही विषयावर बोलण्याची हातोटीपण त्याच्या अंगी आली.

दुसरा सांगण्यासारखा aspect म्हणजे विक्रमचा cultural activities मधील विशेष सहभाग. नाटक, संगीत based कार्यक्रम बसवणे ह्यात त्याला अभिरुची वाटू लागली व त्यात त्याने हिरीरीने पुढाकार घ्यायला सुरुवात लहानपणीच केली.

मोठ्या प्रतिथयश व्यक्तींना कार्यक्रमाला निमंत्रित करणे, संपूर्ण आयोजन करणे यात विक्रम रमू लागला. इथेच त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक leadership ची सुरुवात झाली असे म्हणायला हवे. ह्यातूनच पुढे 'आरोही' ह्या सांस्कुतिक संस्थेमध्ये committeeत पुढाकार घेऊन कार्यक्रम आयोजित करणे, नाटकात भाग घेणे वाढले. sacramento मंडळात भाग घ्यायच्या आधी Austin मंडळात विक्रम होता. पुन्हा बे-area त ५ वर्षे राहिल्याने मराठी मंडळे कशी चालतात, त्यांचे कार्य हे कसे एक challenge असते हे विक्रमला अनुभवाने माहिती झाले आहे. त्याचा आपल्या मंडळाला फायदाच होत आहे.

विक्रमला संगीत ऐकण्याची पुष्कळ आवड आहे. 'old is gold" अशी हिंदी व मराठी गाणी ऐकणे हा त्याचा खास छंद. बहुतांशी मराठी माणसाप्रमाणे 'शिवाजी' हे त्याचे दैवत. त्याने एक गोष्ट राजांबद्दल सांगितली जी माझ्या अजूनही मनात ठसली आहे - तो म्हणाला कि आपल्या इतिहासात अनेक mythological आदर्श आहेत. पण कधी कधी काही प्रसंगावरून वाटते कि ते खरे असेल कि नाही. पण शिवाजीने जे काही करून दाखवले त्याचे प्रत्यक्ष पुरावे नुसते त्या वेळेच्या नोंदीत आढळते असेच नाही तर जागोजागी प्रत्यक्ष पुरावे आढळतात. त्यामुळे शिवाजीच्या अचाट कर्तुत्व व कामगिरीबद्दल तिळमात्र संशयाला जागा नाही. म्हणजे जे वाचतो ते खरेखुरे झाले व शिवाजीने केले यावरून राजांबद्दल जास्तच कौतुक, अभिमान वाटतो. किती खरा आहे हा विक्रमचा वेगळा विचार व मुद्दा!

अस्मिताचे सगळे बाळपण तसेच शालेय व कोलेज शिक्षण - पुणे एके पुणे. तिथून इंजिनियर झाल्यावर, तिचे व विक्रमचे लग्न झाले. विशेष म्हणजे, अमेरिकेत आल्यावर san jose state university मधून इलेक्ट्रीकल इंजिनियर हि मानाची उच्च पदवी तिने संपादली ज्यामुळे intel कंपनीत नोकरीपण पटकन मिळाली. पुणे व नागपूर जरी दूर असले तरी त्यांचा रीतसर arranged विवाह २००८ मध्ये झाला

व ते दोघे इथे आले (तो आधी दोन वर्षे इथे होता). त्यांचा गोड मुलगा २०१२ साली त्यांच्या जीवनात आला. त्याचे नाव आहे 'विवान' (Vivaan) जे एक 'कृष्णा'चे नाव आहे. सांगायची गोष्ट म्हणजे विवानचा जन्म 'लक्ष्मीपूजन' च्या दिवाळी दिवशी झाला. २० महिन्याच्या छोट्या vivaanला "चिऊताई चिऊताई दार उघड" ह्या मराठमोळ्या बालगीताची, ह्या अस्सल मराठी घरात, गोडी वाटली तर नवल ते काय!

विक्रम व अस्मिता दोघे computer प्रोफेशनल; विक्रम HP (Roseville) कंपनीत तर अस्मिता Intel (कुठे ते सांगायला हवे का!) मध्ये. विक्रमच्या कामाचा मुख्य भाग networking/software मधला तर अस्मिता आहे hardware/verification मध्ये. अस्मिताने Intel मध्ये Folsom मध्ये जॉब घेतला ते आपल्या सर्वांसाठी चांगलेच झाले कारण त्यामुळे विक्रम bay-areaतील नोकरी सोडून इथे आला व आपल्याला त्यासारखा मित्र, leader, मिळून गेला.

जॉब व मुलगा सांभाळून अस्मिताला लोकांना भेटणे, सांस्कुतिक कार्यक्रमात भाग घेणे मनापासून आवडते. म्हणूनच कि काय, तिने १६ ऑगस्ट ला India Day event मध्ये आपल्या मंडळाचा जो कोळी dance सादर होणारा आहे त्यात भाग घेतला आहे. आणखी सांगायची बाब म्हणजे, ति अतिशय सुग्रण असून उत्तम पदार्थ बनवते अशी कौतुकाची पावती विक्रमने स्वतः दिली. तिची specialty dish म्हणजे 'दाबेली' (अहाहा, कधी एकदा खातो असे झाले!)

९०% मराठी कुटुंबाप्रमाणे, विक्रम व अस्मितासुद्धा ageold व typical 'देसी' dilema तून जात आहेत कि अमेरिकेत रहावे का मायभूमीला कायमचे परतावे. माझी खात्री आहे कि बहुतेक लोकांसारखे हे दाम्पत्यपण त्यांच्या दृष्टीने योग्य निर्णय घेईल. पण निदान आत्तातरी आपण खूष राहूया कि विक्रमसारखा उमदा

तरुण आपल्या भागात आहे, आपल्यात आहे व मंडळात चांगला मार्गदर्शन करत आहे. जर भेटला नसाल तर ह्या बोलक्या व्यक्तीला मंडळाच्या पुढील कार्यक्रमात नक्की भेटा. विक्रम आणि अस्मिता, तुम्हाला दोघांना धन्यवाद, हि तयारी दाखवल्याबद्दल व या आठवड्यात एक छान संध्याकाळ माझ्याशी मनसोक्त गप्पा मारल्याबद्दल!

पुढील अंकात असेच भेटू आपल्यातीलच आणखी कोणी एका जोडीला!

- **मराठी शाळा**



पल्लवी सावंत - शाळा संयोजक

गेल्या वर्षी मंडळाने सॅक्रामेंटो मध्ये मराठी शाळा सुरु केली. ही शाळा म्हणजे मराठी मंडळ सॅक्रामेंटो, बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि भारती विद्यापीठ, पुणे ह्यांच्या सहकार्याने सुरु केलेला एक नवीन उपक्रम! सध्या ३ ठिकाणी (Roseville, Folsom, Balvihar) भरणाऱ्या ह्या शाळेमधून एकंदरीत ३६ मुले मराठीची ओळख करून घेत आहेत. कोणतेही नवीन कार्य म्हटले की त्यात अडथळे आणि समस्या या आल्याच! मग त्याला मराठी शाळा तरी अपवाद कशी ठरणार? प्रशासकीय समस्या किंवा परिस्थितीजन्य समस्या ह्यांचा ह्यात प्रामुख्याने समावेश होतो. उदाहरणार्थ, मुलांची संख्या जास्त असूनही सध्या घरी शाळा घेण्याचे अवघड काम काही पालक करीत आहेत. फोल्सम शाळेसाठी मुख्यत्वे आम्ही एक नवीन जागेच्या शोधात आहोत परन्तू शाळे चे वार्षिक शुल्क त्यामुळे वाढेल व आणि काही समस्या अजून येऊ शकतात.

असो, ह्या वर्षी शाळेमधून ७ मुलांनी भारतीय विद्यापीठातर्फे घेतली जाणारी परीक्षा दिली. भारती विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या ५ परीक्षांपैकी ही पहिल्या वर्गाची परीक्षा होती. सर्व मुले ह्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. ह्यात त्यांचे पालक आणि शिक्षकांचे मार्गदर्शन आणि त्यांचा स्वतः चा उत्साह वाखाणण्यासारखा आहे. परीक्षा आयोजित केल्याबद्दल सौ शीलाताई कुलकर्णी यांचे मनापासून आभार.

पुढच्या वर्षी ची नोंदणी आता सुरु झाली आहे. अधिक माहिती साठी पालकांनी shala@mmsac.org ह्या ई-मेल वर संपर्क साधा आणि शाळेच्या website (shala.mmsac.org) वर शाळेबद्दल माहिती वाचा.

**मराठी शाळा परीक्षेचे काही क्षण**:






https://picasaweb.google.com/109334431543243484453/MarathiShalaExamJune2014



## कविता - पहिला सूर्योदय - Contributed by Ajit Natu

चालली होतो पुढे
कळपाच्या
मस्ती होती भान होते
अन्
आकाश गाठायचे होते

ठेंगणे वाटले आकाश
क्षितीज तर आत्ता पार करेन
कारण
त्याच्यापेक्षा
हृदय मोठे होते

वास्तव तर प्रतीकुलच
संस्कारपण सावधतेचे
तरी पण
मनाची भरारी सीमापार
कारण स्वप्नाला कुंपण नव्हते

सगळे पाठून येणारे
म्हणाले पण की
शेळयामध्ये सिंह
चिमटीमध्ये आकाश
पकडणारा हाच होता

काट्यांचा मार्ग तरी
पाउलखुणा दिशा योग्य
उमेदीचा अश्व
तारुण्याचा नसलेला लगाम
तरी भान होते

खिशात नसलेले बळ
मनगटात होते
पुढचे माहित नसलेले
अंतर कापायला
मन धारदार होते

निघालो कोठे अजाण उंच धूरूवाकडे
जवळ दाखवायला तसे
काहीच नव्हते
तरी जीवनात काही
करून दाखवायचे होते

केवळ अंगातल्या कपड्यांनी
जगावर पांघरूण घालायचे होते
एकट्या हातांनी
जगाला तोलायचे होते

परिस्थितीचा अंधार
तरी विजेचा लोळ हातात
धरून जगाला प्रकाश
जवळच्या फुटक्या कवडीतून
जगाची गरिबी दूर करायची होती

अमाप स्वप्न, उमेद, ईर्षा
जवळ होती अन् चाललो होतो
माझ्याकडे विश्वासाने
नशीब खिशात नसणारे
जवळ माझ्या काय होते

तो काळच वेगळा
ते वयच वेगळे
सूर्य प्रथम डोळे उघडे
तेव्हा जगच वाटते सोनेरी
म्हणून प्रकाश द्यावा वाटतो

माहीत नव्हते मध्यान्ह येणार
अन् रात्र सामावून घेणार असते
सूर्योदय माझा पहिला
उमेदीचा, स्वप्नांचा
काही तरी करून दाखवायचा

## Article below is contributed by Ramesh Kotwal

Hello MMSAC Friends,

It has been a pleasure to be a member of MMSAC since its beginning. It feels good to see it flourish and do well. I have decided to become a Platinum Sponsor of our Mandal, because I believe I can bring a good value to young member's financial planning. I have sophisticated tools which analyze various financial needs throughout the life span. It takes into consideration survival needs, college education for children and financial support to fulfill Retirement dreams.

In a way Insurance is not a new idea for any of us. We know that we all need it. (I am sure some of you already have Whole Life Policies*). My goal is to show you how to use Insurance as a vehicle to achieve all the above mentioned needs.

What we accomplish through our plan is to remove the market volatility but maintain a level of gain whether market goes up or down. The plan's biggest driving force is to use IRS rules and regulations to generate tax free income. We also have alternatives for 401K

For senior members, I have annuities, 401K rollovers and some hybrid products to generate tax advantaged income. Please check out my website and do watch Ed Slott's clip about retirement rescue: www.raykotwal.biz

A few lines about myself: I am originally from Pune, settled in US for more than 40 years. I have an MBA from Kellogg Business School (Northwestern University) I retired from Praxair as a director of Global Marketing.

Looking forward to working with you.

- Get your existing Whole Life Policies analyzed and possibly bettered at no cost.


**People don't plan to fail, they just fail to plan**

**KIFS Kotwal Insurance and Financial Services**

**Phone: 916-479-7007 Cell: 916-752-5539**

मराठी शब्दकोडे, चुटके, community roundup

## शब्दकोडे



**आडवे शब्द:**

१. दिवाळीतील फटाक्यांचा एक प्रकार
३. (दिव्यांची) सजावट
७. घर किंवा स्थान
८. पोहऱ्यांची रांग असलेले, सतत वर-खाली फिरणारे मोठे चक्र. किंवा नशीबाचे नेहमी होणारे फेरफार. एकसारखी देवघेव, व्यवहार.
१२. एका शब्दाच्या उच्चारासारख्या उच्चाराचा दुसरा शब्द आल्यास हा शब्दालंकार जुळतो.
१५. श्रेष्ठ, वरचढ
१६. अदृश्य झालेला, हरवलेला, लपलेला
१७. दिवाळीच्या फराळातील एक तिखटमीठाचा पदार्थ
१९. उसाचा रस काढायचे एक मोठे यंत्र
२०. रान
२१. जागरुक
२२. जाड बांगडीसारखा दागिना

**उभे शब्द:**

१. जमिनीखालचा मार्ग, खोली
२. कंटाळवाणी बडबड
४. श्रीकृष्णाची मैत्रिण
५. योग्य, चोख
६. दुडकी चाल, घोड्याची चाल, लष्करी चाल
९. तीव्र इच्छा, लोभ
१०. चांगली पारख नसलेला
११. गाण्यासारखे, श्रवणीय
१३. मनातलं ओळखणारा
१४. परतपरत तेचतेच म्हणणे.
१८. नम्र किंवा एकजीव झालेला

**सोडवलेली उत्तरे अजित नातू यांना पाठवा**

# चुटके जोक्स

एका बाइकरून तिघे जात असतात. ट्रॅफिक पोलीस त्यांना अडवतात.
ट्रॅफिक पोलीस : बाइकवरून ट्रिपल-सीट जाणं हा गुन्हा आहे, माहीत नाही का?
एक जण : माहिती आहे..: म्हणून तर एकाला घरी सोडायला जातोय

unmarried man : अहो, सांगा पाहू...लॉटरीचं तिकिट आणि बायको यात फरक काय आहे?
married man : काही नाही...लॉटरीचं तिकिट काढणा - याला जिंकायची थोडीतरी संधी असते.

" बाळांनो," शाळा गुरुजी व्याकरण शिकवताना म्हणाले, "कोणताही शब्द तुम्ही दहा वेळा उच्चारा. तो तुम्हाला आत्मसात होईल."
" आत्मसात म्हणजे काय?" नन्यानं विचारलं.
" आत्मसात म्हणजे आयुष्यभराचा तुमचाच होऊन जाईल."
लगेच मागच्या बाकावरून ऐकू आलं, "ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, ऐश्वर्या, !!!!"

# Community Round Up

## Up Coming MMSAC Event

- 3th August 2014 (India Day Indoor Sport day) at Grange Hall, 5807 Walnut Ave, Orangevale, CA (Carrom, Chess & Quiz ( On India )
- 16th August 2014 (Independence Day Celeberations - IAS) - Look for Flyer that will be sent in August
    - MMSAC has a Koli Dance Performance (Coordinated by - Dimple Nimkar, Participants - Vrushali Parab, Vinayak Patil, Madhuri Natu, Ajit Natu, Sujata Pawar, Amar Pawar, Priya Josh, Shrikant Joshi, Asmita Bobde, Anand Meher, Shubhangi Chitnis, Vikrant Sawant)
    - Practices are on going
    - Come and support mandal group on 16th August
- MMSAC Camping (8, 9, 10 August)
- Ganesh Chaturthy - 6th September (Time TBD)

## Birthdays:

- Som and Veer Pawar



**पुढील अंकात jokes, फोटो, माहिती, recipe नक्की पाठवा.**

## Our Sponsors

### Platinum sponsors

In the Nation, what matters to us is what matters to you.



When it comes to protecting what you love, it's not what you know, but who you know. Someone who cares about what you care about. At Nationwide Insurance, we call them agents. You'll call them friends. We put members first, because we don't have shareholders.

**Join the Nation where protection is personal.**

Join me in Folsom.
**Jay Jayaraman**
The Jay Jayaraman Insurance Agency
(916)668-8000
jayarj2@nationwide.com

**Nationwide**®
Insurance

*Nationwide is On Your Side.**

Products underwritten by Nationwide Mutual Company and Affiliated Companies, Columbus, Ohio. Not all Nationwide affiliated companies are mutual companies and not all Nationwide members are insured by a mutual company. Nationwide, Nationwide Insurance, the Nationwide framemark, Nationwide is On Your Side and Join the Nation are service marks of Nationwide Mutual Insurance Company. ©2013 Nationwide Mutual Insurance Company. All rights reserved. NPR-0501ML1 (01/13)


California IVF Fertility Center
In Collaboration with UC Davis Health System
Offices in Sacramento and Davis
Fertility Testing and Treatment
IVF, ICSI, and Inseminations
Tubal Reversal Surgery
Vasectomy Reversal
Genetic Testing of Embryos
PGD/PGS
Family Balancing (Boy or Girl)
Egg Donation Program
Donated Embryos
(530) 771-0177
www.CaliforniaIVF.com

# KIFS Kotwal Insurance & Financial Services

***People don't plan to fail, They just fail to plan***

When it comes to happy retirement, key is to plan well.

**Dear Friend,**

**Just Half an Hour with Me Can HELP you:**

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

**Ray Kotwal, MBA Finance**

**Life Insurance and Planning Specialist**

**Insurance License No. OH12645**

Remember KIFS for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com